**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अरुण महादेव जाधव
१०/५०, शाळा नं.२ जवळ धान्य ओळ, इचलकरंजी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरुण महादेव जाधव
१०/५०, शाळा नं.२ जवळ धान्य ओळ, इचलकरंजी, जि.कोल्हापूर
तर्फे ॲड.आर.के.देसाई
**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, .
सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.४.३००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>बँकेकडे थकित असलेल्या संस्थांची नावे व त्यांच्या रकमा. अशा ज्या थकित संस्था आहेत, अशा संस्थांच्या संचालक मंडळात बँकेचे कोणी संचालक त्या संस्थेत आहेत काय, अशा संस्थांची व बँकेच्या संचालकांची नांवे व थकित रकमा. अशा थकित संस्थांवर आपल्या बँकेच्या संचालकांवर बँकेने काय कायदेशीर कारवाई केली आहे, अशी प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असलेल्या दाव्यांची माहिती. अशा प्रलंबित असलेल्या दाव्यांच्या आदेशाने बँकेच्या कोणा संचालकांच्या स्थावर मालमत्तेवर बँकेने बोजा नोंद केला आहे काय, असल्यास त्या संचालकांची नांवे, अशी बोजा नोंदविण्यात आलेल्या मालमत्तेचा गट नंबर, सिटी सर्व्हे नंबर किंवा ग्रामपंचायत अथवा नगरपालिका नोंदी नंबर इ.माहिती. |
|---|---|

## विवेचन

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे मागितलेली माहिती विहित मुदतीत न मिळाल्याबद्दल जन माहिती अधिकाऱ्यांना दंड करावा, या मागणीसाठी अपीलकर्ता श्री.अरुण महादेव जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, कोल्हापूर या बँकेच्या थकित संस्था आदींबाबतची माहिती श्री.जाधव यांनी मागितली होती. तीस दिवसांच्या विहित मुदतीत माहिती मिळाली नाही, म्हणून श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून विभागीय निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग यांच्याकडे अपील केले. हे अपील त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नसल्याने त्यांनी ते जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे वर्ग केले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ आपल्या बँकेला लागू होत नाही, अशी भूमिका बँकेने मांडली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील अंशत: मान्य केले व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये 'माहिती' या व्याख्येमध्ये अभिप्रेत आहे, अशी माहिती चार आठवड्यांमध्ये द्यावी, असा आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यांनी दि.३.४.२००७ रोजी हा आदेश दिल्यानंतरही त्या मुदतीत आपल्याला माहिती मिळाली नाही, म्हणून श्री.जाधव यांनी दि.२३.४.२००७ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांना पत्राद्वारे कळविले. परंतु मागितलेली माहिती ढोबळ स्वरुपाची असल्यामुळे

आपल्या बँकेला कोणतेही शासकीय अनुदान मिळत नाही. पूर्णपणे संस्थेच्या आर्थिक बळावर उभी असलेली व सहकार कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीपासून कार्यरत असलेली अशी ही बँक आहे. त्यामुळे तिला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. अपीलकर्ता हे संस्थेचे सभासद नाहीत. महाराष्ट्र राज्य सहकार कायद्यानुसार सभासदांना माहिती मिळू शकते, परंतु अपीलकर्ता बँकेला त्रास देण्यासाठी माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहेत, असे प्रतिपादन बँकेचे वकील श्री.राहुल देसाई यांनी केले.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला हा कायदा लागू आहे असे आपण स्पष्ट केले असून त्याबाबत आपण सविस्तर पत्रे बँकेला पाठविलेली आहेत, असे अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी नमूद केले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील सर्व सहकारी बँकांची शिखर बँक आहे. जिल्ह्यात एकच मध्यवर्ती सहकारी बँक अशा मक्तेदारीच्या हक्काचे स्थान कायद्याने तिला दिलेले आहे. नाबार्डतर्फे, तसेच शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या खर्च वा सवलतींच्या योजनांबाबत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत कार्यवाही केली जाते. तसेच इतर वित्तीय संस्थाकडून बँकेने घेतलेल्या अर्थसहाय्यास शासकीय हमीच्या स्वरुपात सहाय्य केले जाते. या बाबी लक्षात घेता कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेलाही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक विरुध्द श्री.बबनराव ढाकणे या अपील क्र.२००६/१७६/०२ व क्र.२००६/१८३/०२ मध्ये राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांना या संदर्भात संबंधित खात्याकडून विचारणा करुन घेतलेल्या स्पष्टीकरणासह सविस्तर उहापोह केला असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो, हे स्पष्टपणे निर्देशित केले आहे. ती कारणमीमांसा येथेही लागू आहे.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आपली हरकत कायम ठेवूनही अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क दिली आहे. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ढोबळ मानाने सरसकट व अतिशय व्यापक स्वरुपाची अशी आहे. वस्तुतः अशा स्वरुपाची मागणी केल्यास अभिलेखांचे अवलोकन करु देणे हा उचित पर्याय ठरतो. परंतु

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ९३०० सभासद संस्था, २०७ शाखा या विस्तारातून अपीलकर्त्याला हवी असलेली माहिती संकलित करुन देणे अधिक कालावधी लागणारे असल्याचा निष्कर्ष प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निर्णयात रास्तपणे नोंदविला आहे. माहितीच्या अधिकाराचा कायदा लागू होतो की नाही याबाबतचा मतभेद व मागितलेल्या माहितीचे ढोबळ व विस्तृत स्वरुप लक्षात घेता माहिती देण्यास झालेला विलंब दंडनीय नाही. त्यामुळे तो क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

१.श्री.संजय सदाशिव माजलकर
२.श्री.बिभीषण मारुती चव्हाण
गुडवील सत्यम सहकारी गृहरचना संस्था( मर्यादित),
प्लॉट नं.१, सर्व्हे नं.५५/१+६७/ १ व २, गोकुळनगर,
धानोरी, पुणे-४११०१५

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५१ / पुणे / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** १.श्री.संजय सदाशिव माजलकर
२.श्री.बिभीषण मारुती चव्हाण
गुडवील सत्यम सहकारी गृहरचना संस्था( मर्यादित),
प्लॉट नं.१, सर्व्हे नं.५५/१+६७/ १ व २, गोकुळनगर,
धानोरी, पुणे-४११०१५

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका श्री.प्र.वा.गेडाम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुणे महानगरपालिका कमेन्समेंट प्रमाणपत्र क्र.सीसी/०२४४/०३, दि.१३.१०.२००३ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या आराखड्याप्रमाणे गुडवील सत्यम या इमारतीच्या बांधकामाची कामे पूर्ण झालेली नसताना तसेच मंजूर आराखड्यात दर्शविलेली काही बांधकामे इमारतीच्या आवारात अस्तित्वात नसताना; संपूर्ण भोगवटापत्र (अंतिम) का व कोणत्या परिस्थितीत देण्यात आले? आयुक्त, पुणे म.न.पा. यांना दि.२८.३.२००७ अन्वये संस्थेने दिलेल्या चौकशी व्हावी या अर्जावर आजअखेर झालेली कार्यवाही. याबाबत सदर आर्किटेक्ट, बिल्डर व महानगरपालिकेचे अभियंता श्री.इंगवले यांच्यावर काय कारवाई केली? सदनिका क्र.१,६,११,१३ व १६ मधील सभासदांना अतिक्रमित बांधकामाच्या नोटिसा व वसुलीच्या नोटिसा पाठविण्यात आल्या त्या अभिलेखाची छायांकित सत्यप्रत. | |

## विवेचन

सहकारी गृहरचना संस्थेतील जागेवरील प्रत्यक्ष बांधकाम व मंजूर आराखडा यात फरक असून आराखड्यातील काही बांधकाम अस्तित्वातच नसताना संपूर्ण भोगवटापत्र कसे देण्यात आले, अशी विचारणा व त्याअनुषंगाने माहितीची मागणी अपीलकर्ता श्री.संजय सदाशिव माजलकर, अध्यक्ष, गुडवल सत्यम सहकारी गृहरचना संस्था(मर्यादित) व श्री.बिभीषण मारुती चव्हाण, सचिव यांनी जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण कार्यालय,

पुणे महानगरपालिका यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर चुकीचे व दिशाभूल करणारे असल्याच्या कारणावरुन आपण अपील केले. परंतु अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी त्याची दखल घेतली नाही व अचूक माहिती मिळाली नाही, या कारणावरुन श्री.माजलकर व श्री.चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

मंजूर आराखड्याप्रमाणे बांधकाम झालेले नसताना अंतिम प्रमाणपत्र कसे देण्यात आले, याचे उत्तर अद्याप आपल्याला मिळालेले नाही, असे श्री.माजलकर व श्री.चव्हाण यांनी नमूद केले. माहितीच्या अधिकारात येणारी संपूर्ण माहिती अपीलकर्त्यांना देण्यात आली आहे. आराखड्यानुसार मंजूर असलेल्या बांधकामाव्यतिरिक्त काही बांधकाम काही सदनिकाधारकांनी केल्याचे समक्ष जागेवर पाहणीत निदर्शनास आल्यामुळे कारवाई करण्यात आली आहे. तसेच आर्किटेक्ट श्री.उदय बोरगावे व बिल्डर श्री.अशोक आगरवाल यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून ऊर्वरित कामे पूर्ण करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. सुमारे दोन महिन्यांच्या कालावधीत त्यांनी ती पूर्ण करणे अपेक्षित आहे, असे श्री.गेडाम यांनी लेखी व तोंडी प्रतिपादन केले.

अपीलकर्त्यांची मूळ मागणी संबंधित आर्किटेक्ट व बिल्डर यांच्यावर कारवाई होण्यासंबंधातील आहे, असे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र या विषयाच्या अनुषंगाने सोसायटीच्या सभासदांनी पुणे महानगरपालिका आयुक्तांकडे केलेल्या तक्रारीवरील कार्यवाही व मंजूर आराखड्यानुसार बांधकाम नसताना अंतिम भोगवटापत्र देण्याच्या कारणांबाबतची माहिती अपीलकर्त्यांना देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) गुडवील सत्यम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित या सोसायटीच्या सदस्यांनी पुणे महानगरपालिका आयुक्तांकडे संबंधित बांधकामाबाबत केलेल्या तक्रारीवरील कार्यवाही, अपूर्ण बांधकामे दोन महिन्यांत पूर्ण करण्याबाबतच्या आदेशाची अंमलबजावणी व मंजूर आराखड्यानुसार बांधकाम नसताना अंतिम भोगवटापत्र देण्याची कारणे, याबाबतचा अहवाल अपीलकर्त्यांना देण्याच्या आयोगाच्या आदेशाच्या अनुपालनाचा अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला दि.१५.९.२००९ पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हिंमतसिंह नारायणराव भोसले
मु.पो.पिंपळगाव, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, पुनर्वसन,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हिंमतसिंह नारायणराव भोसले
मु.पो.पिंपळगाव, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री.ए.डी.चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.४.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जिल्हाधिकारी(पुनर्वसन)कोल्हापूर, याच्याकडील जा.क्र.कार्यासन१५(१०) पुनर्वसन/आरआर/१३०/२००२ झालेल्या चुकीच्या आदेशाची नक्कल, दि.२३.१२.२००३रोजी पुनर्वसन अधिकारी, कोल्हापूर यांनी तहसीलदार, भुदरगड यांना ग.नं.८२७/अ, ब चा ताबा न दिल्याबाबत, अहवाल पाठविण्याबाबत दिलेल्या पत्राची नक्कल, हायकोर्ट,मुंबई येथील रिट क्र.२७०३/०३ मध्ये पुनर्वसन अधिकारी, कोल्हापूर यांनी ग.नं.८२७/अ, ब चे वाटपाबाबत सन १९९९ मध्ये केलेल्या ॲफिडेव्हिटची नक्कल, डिसेंबर १९९८ मध्ये ग.नं.८२७/अ, ब ची केलेल्या कब्जाची आणि त्यावेळी केलेल्या पंचनाम्याची नक्कल. |

## विवेचन

मौजे पिंपळगाव, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर येथील ग.नं.८२७/अ,ब ची गट नंबरमध्ये बदली करण्याबाबत झालेल्या दुरुस्ती आदेशाची सही-शिक्क्याची नक्कल अपीलकर्ता श्री.हिंमतसिंह नारायणराव भोसले यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना सही-शिक्क्याच्या नकला देण्याचा अधिकार नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज देण्यास जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन यांनी कळविले. याच संदर्भात श्री.भोसले यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, अप्पर आयुक्त; पुणे विभाग; पुणे आदी विविध कार्यालयांकडे अर्ज केले. जमीन वाटपाबाबत उच्च न्यायालयात जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यानी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या सही-शिक्क्याच्या नकलासह विविध प्रकारच्या नकला मागणारे अर्ज दि.११.१.२००७, दि.२२.१.२००७, दि.२२.३.२००७, दि.९.४.२००७ व दि.१३.६.२००७ रोजी त्यांनी केले, तरीही नकला न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.भोसले यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी फेटाळले. तहसीलदार, पुनर्वसन, कोल्हापूर यांनी या विषयासंदर्भात वेळोवेळी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे नमूद करुन त्यांनी अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.भोसले यांनी लोकायुक्तांकडे अपील केले व त्यांनी

कार्यक्षेत्राअभावी ते श्री.भोसले यांना परत पाठविले. त्यानंतर श्री.भोसले यांनी; नकला देण्याबाबत टाळाटाळ व विलंब होत असल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तही श्री.भोसले यांनी आपण मागितलेल्या चार नकला मिळाल्या नसून देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे नमूद केले. उभय घटकात एकमत झाले नाही त्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

संबंधित अधिकाऱ्यांनी जानेवारी २००२ मध्ये गट नंबरच्या उताऱ्यावर अदलाबदल करुन मनमानी कारभार केला आहे. आपल्याला विविध ठिकाणी अर्ज करावे लागले, असे श्री.भोसले यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. श्री.भोसले यांनी मागणी केल्याप्रमाणे सही-शिक्क्याच्या नकला देण्यासाठी लागणाऱ्या फाईल्स दि.२.२.२००७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, कार्यासन-१३, अभिलेख कक्ष, कोल्हापूर यांच्याकडे आपण सादर केल्या व त्यानुसार श्री.भोसले यांनी सही-शिक्क्याच्या नकला प्राप्त करुन घेतलेल्या आहेत. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची नक्कल आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे व मुंबई उच्च न्यायालयात दाखल असल्याने देता आलेली नाही. वेगवेगळ्या स्वरुपाचे अनेक अर्ज करुन अपिलात त्या सर्वांचा समावेश श्री.भोसले यांनी केला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.भोसले हा विषय सातत्याने विविध पातळ्यांवर मांडत असून मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती त्यांनी प्रथम व द्वितीय अपिलात मागितली आहे. मूळ अर्जानुसार त्यांनी मागितलेल्या नकला त्यांना संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आहेत, असे प्रतिपादन विद्यमान अपिलीय प्राधिकारी यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.भोसले यांनी विविध अर्जांद्वारे केलेल्या मागणीचा समावेश-ते अर्ज माहितीच्या अधिकारातील असल्याचे गृहीत धरुन-अपिलात केला आहे. तसेच प्रथम व द्वितीय अपिलात मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती मागितली आहे, असे

दिसून येते. त्यांची ही कृती योग्य नाही. त्यांनी मागणी केलेल्या नकला त्यांना देण्यात आल्याचे दिसते. तहसीलदार, भुदरगड यांना पाठविलेल्या पत्राची प्रत देण्याची मागणी श्री.भोसले यांनी सुनावणीच्या वेळी केली, ती १५ दिवसात देण्याचा मौखिक आदेश आयोगाने दिला. त्यानुसार या पत्राची नक्कल त्याना देण्यात आल्याचे जिल्हा पुनर्वसन अधिकारी, कोल्हापूर यांच्या वतीने दि.२४.७.२००८ च्या पत्राने आयोगाला अवगत करण्यात आले आहे. उताऱ्यात झालेल्या अदलाबदलीबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही योग्य की अयोग्य हा माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१०.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सचिन जगन्नाथ पोवार — अपीलकर्ता
२४/१५१, दत्तनगर, शहापूर-इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
उप निबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१ + ४७१ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | ९.७.२००८ व २८.४.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सचिन जगन्नाथ पोवार
२४/१५१, दत्तनगर, शहापूर-इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर जि. कोल्हापूर श्री. धनंजय डोईफोडे

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले,
जि. कोल्हापूर श्रीमती निलिमा गायकवाड

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र. ४७१**

बाजीप्रभू नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, इचलकरंजी यांनी दिलेल्या माहितीची तपासणी करून उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांनी आयुक्तांना पाठविलेल्या वस्तुनिष्ठ अहवालाची प्रत

**अपील क्र. १३१**

सन २००५-२००६ चा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, नोकर पगारपत्रक, कर्मचारी प्रॉव्हिडंट फंडाची समरी, सन १९९९ ते २००६ पर्यंतचे हजेरी पत्रक, कर्मचारी प्रॉव्हिडंट फंडा संबंधित संचालक मंडळाने केलेल्या ठरावाची प्रत, सिक्युरटी ठेव या नावाच्या लेजरमध्ये कर्मचारी प्रॉव्हिडंट फंडाचे खात्यामध्ये खाते क्र. ३/१०/१ चा अपीलकर्त्याच्या नावाचा खाते उतारा

## विवेचन

बाजीप्रभू नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, इचलकरंजी, ता.हातकणंगले या संस्थेकडून मागितलेली माहिती संस्थास्तरावरील असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. संस्थेकडून माहिती मिळाली नाही, म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे आपण अपील केले, परंतु त्यांनी ते फेटाळले, या कारणावरून अपीलकर्ता श्री. सचिन जगन्नाथ पोवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. (अपील क्र. १३१)

आयोगाने दि. १३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

माहिती संस्थास्तरावरील असल्यामुळे संस्थेकडून घ्यावी, असे अपीलकर्त्यास कळविले व माहिती देण्याबाबत संस्थेला विहित मुदतीत कळविले. परंतु अपीलकर्त्याने संस्थेकडे संपर्क न साधल्यामुळे माहिती दिली नसल्याचे संस्थेने दि. १०.११.२००६ च्या पत्राने कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले यांचे प्रतिनिधी श्री. ए. पी. खामकर यांनी प्रपत्रात नमूद केले. त्यानंतर संस्थेकडून माहिती घेऊन अपीलकर्त्यांना देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. ए. पी. खामकर यांनी नमूद केले. अपीलकर्ता गैरहजर होते. त्यामुळे दि. ९.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला माहिती मिळाली, परंतु ती पूर्णपणे चुकीची आहे. 'कर्मचारी प्रॉव्हिडंट फंड' असताना 'कर्मचारी सिक्युरिटी ठेव' अशी चुकीची माहिती दिली आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सचिन जगन्नाथ पोवार यांनी केले. संस्थेने दिलेल्या माहितीची तपासणी करून ती योग्य आहे की नाही, याचा अहवाल सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर श्रीमती निलिमा गायकवाड यांना सुनावणीच्या वेळी दिले.

उपरोक्त पतसंस्थेबाबत चुकीची माहिती दिल्याबाबत त्यांच्यावर केलेल्या कारवाईच्या अहवालाची प्रत मागणीसाठीचा अर्ज श्री. पोवार यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले यांच्याकडे दि. २६.८.२००८ रोजी केला. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही, म्हणून श्री. पोवार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. 'दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे झालेल्या सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार बाजीप्रभू नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, इचलकरंजी या संस्थेने दिलेल्या माहितीची तपासणी करून त्याची सत्यासत्यता पडताळून करून आयोगाला अहवाल सादर करावा,' अशी सूचना अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. धनंजय डोईफोडे यांनी उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर श्रीमती निलिमा गायकवाड यांना दि. १०.७.२००८ रोजी दिला. आपल्याला अद्यापही खरी माहिती न मिळाल्याच्या कारणावरून व उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले यांनी सादर केलेल्या अहवालाची प्रत मिळाली नाही, म्हणून श्री. पोवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. ३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. २८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. (अपील क्र. ४७१ )

श्री. पोवार यांनी मूळ अर्ज केला तेव्हा जन माहिती अधिकारी असलेल्या श्रीमती निलिमा गायकवाड दरम्यानच्या काळात अपिलीय प्राधिकारी झाल्या.

आयोगाच्या आदेशानुसार अहवाल सादर करण्याबाबत उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर यांना दि. १०.७.२००८ रोजी कळवूनही अद्याप असा अहवाल त्यांनी दिलेला नाही. या अहवालाची अंमलबजावणी त्यांनी करणे आवश्यक आहे, करिता सुनावणी घ्यावी, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. धनंजय डोईफोडे यांनी प्रपत्रात नमूद केले.

दि. १३.५.२००८ रोजी माहिती दिली असल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. बी.आर. डोंगळे यांनी नमूद केले. खरी माहिती व अहवालाची प्रत आपल्याला मिळाली नसल्यामुळे संबंधितांवर कारवाई व्हावी, असे श्री. पोवार यांनी नमूद केले.

श्रीमती निलिमा गायकवाड यांनी दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे झालेल्या सुनावणीनंतर कोणतीही कार्यवाही केलेली नाही, असे श्री. पोवार यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले.

श्री. पोवार यांनी मागितलेली माहिती संस्थास्तरावरील असल्यामुळे संस्थेला कळविले. माहिती देण्याची संस्थेची तयारी होती, परंतु श्री. पोवार यांनी त्यांच्याकडे संपर्क साधला नाही, म्हणून आपण संस्थेकडून माहिती घेऊन ती श्री.पवार यांना दिली. सन १९९९ ते २००२ चे हजेरीपत्रक संस्थेकडे उपलब्ध नसल्यामुळे ते दिले नाही. सन २००२ ते २००३ पासून प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम सिक्युरिटी ठेव खात्याकडे वर्ग केलेली आहे. संस्था श्री. पोवार यांना ती रक्कम देण्यास तयार आहे, परंतु टपालाने कळविल्यास अपीलकर्ता पत्र मिळाले नसल्याचे सांगतात, व समक्षही येत नाहीत, असे प्रतिपादन श्री. डोंगळे यांनी केले. माहितीची पडताळणी करून आपल्याला अहवाल देण्यास सांगण्यात आले होते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांना आपण प्राधिकृत केले होते व त्यांनी अहवाल सादर केला आहे. माहितीबाबत संस्थेच्या प्रतिनिधींना वारंवार सूचना दिलेल्या आहेत, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्रीमती निलिमा गायकवाड यांनी सांगितले. श्री. डोंगळे यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांना दि. १६.२.२००९ अन्वये सादर केलेल्या अहवालाची प्रत त्यांनी दाखल केली.

सदर अहवाल सादर करण्याचे आदेश आयोगाने श्रीमती गायकवाड यांना दिले होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही त्यांना त्याची लेखी जाणीव दिली होती, तरीही त्यांनी स्वतः अहवाल सादर केला नाही. मुख्य लिपिक श्री. बी. आर. डोंगळे यांना अहवाल सादर करण्यास प्राधिकृत केल्याचे पत्र दिल्याची प्रत त्या सादर करू शकल्या नाहीत. श्री. डोंगळे यांनी सादर केलेल्या अहवालाची तारीखही १६.२.२००९ अशी आहे. म्हणजे आयोगाने दि. ९.७.२००८ रोजी आदेश दिल्यापासून पाच महिन्यांनी अहवाल सादर झाला आहे, तोही जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांना दिला आहे. श्रीमती गायकवाड यांनी आयोगाला त्याची प्रत त्यावेळी सादर केलेली नाही, म्हणजेच मूळ आदेशापासून सुमारे पाच महिन्यांपर्यंत श्रीमती गायकवाड यांनी अहवालाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. ही गंभीर बाब आहे. त्याबद्दल शासकीय सेवा नियमातंर्गत शिस्तभंगाची कारवाई त्यांच्यावर होणे आवश्यक आहे.

श्री. पोवार यांनी माहिती चुकीची असल्याचे प्रतिपादन करणारे लेखी निवेदन आयोगाला वारंवार सादर केले आहे. ते पाहता प्रॉव्हिडंट फंडाची त्यांच्यासह तीन कर्मचाऱ्यांची केलेली कपात सहकार खात्याची परवानगी न घेता कर्मचारी सिक्युरिटी ठेव या खात्याकडे अनधिकृतपणे वर्ग केली आहे व संचालक मंडळानेही तसा ठराव केलेला नाही. संबंधित रक्कम प्रॉव्हिडंट फंड कार्यालय, कोल्हापूर येथे वर्ग करणे आवश्यक होते, तसे केलेले नाही, आदी आक्षेप श्री. पोवार यांनी नमूद केले आहेत. या सर्व बाबी संस्थेने केलेल्या कार्यवाहीच्या कायदेशीरपणाबाबतच्या आहेत. कार्यवाही चुकीची असल्याचा आक्षेप असून त्यामुळे दिलेली माहिती चुकीची आहे, असे म्हणता येणार नाही. किंबहुना दिलेल्या माहितीमुळेच या बाबी कायदेशीर की बेकायदेशीर हे सिंध्द करण्यात अपीलकर्त्याला मदत होणार आहे.

'प्रॉव्हिडंट खात्यामधील रक्कम संस्थेने सिक्युरिटी ठेव खात्याकडे वर्ग केल्यामुळे अपीलकर्ता यांना संस्थेने फंडाची रक्कम अदा केली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. पोवार यांनी कामगार न्यायालय, कोल्हापूर येथे केस नं.१०/२००२ दावा दाखल केला आहे. सदरची बाब न्यायप्रविष्ट असलेने सदर बाबत संस्थेने कोणतीही कार्यवाही केली नाही,' असे श्री. डोंगळे यांनी अहवालात म्हटले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

२. आयोगाच्या आदेशानुसार माहितीची सत्यासत्यता पडताळणी करून अहवाल सादर न केल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, इचलकरंजी, जि. कोल्हापूर श्रीमती निलिमा गायकवाड यांच्याविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा, (शिस्त व अपील ) नियम ८ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी करावी व आयोगाला दि. २२.९.२००९ पर्यंत अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. मनोज दामु बाराथे
मु.पो. बोपखेल, विठ्ठल मंदिरामागे,
ता. हवेली, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, — उत्तरवादी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मनोज दामु बाराथे
मु.पो. बोपखेल, विठ्ठल मंदिरामागे, ता. हवेली, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८
श्री. सुभाष डुंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ श्री. रामदास तांबे

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे बोपखेल येथील सिटी स.नं.८४९ च्या दक्षिणेस सिटी सर्व्हे नं. १२९१ आहे, व त्याच्या दक्षिणेस स्मशान भूमीपर्यंत असलेले खाजगी मालकीचे बखळ जागेत कसलेही आरक्षण नसताना सिमाभिंत बांधून २ ते ३ गुंठे जागेत दुमजली संडास बांधले आहे, व दक्षिण बाजूकडून गटाराचे खोदकाम करण्यात येत आहे. सदर काम कोणत्या अधिकाराने महापालिकेने केले व बौध्द वस्तीमधून नदीकडे जाण्याचा रस्ता बंद का केला आहे, त्याची माहिती

## विवेचन

खाजगी मालकीच्या बखळ जागेत सिमाभिंत बांधून संडास बांधले व रस्ता केला, या बाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडून मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनीही अपील फेटाळले, म्हणून अपीलकर्ता श्री. मनोज दामु बाराथे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संबंधित जागा आपल्या मालकीची असल्याचे श्री. बाराथे यांचे म्हणणे आहे, तर महानगरपालिकेच्या म्हणण्याप्रमाणे ती गावठाणातील सरकारी बखळ जागा आहे. या जागेवर महानगरपालिकेने संडासाचे व सिमाभिंतीचे काम, गटाराचे खोदकाम हे कोणत्या अधिकारात केले, अशी अपीलकर्त्याची विचारणा आहे. महानगरपालिकेने आपल्या मालकीच्या जागेत आपल्या अधिकारात बांधकाम केले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा शहर उपअभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. रामदास तांबे व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. सुभाष डुंबरे यांनी प्रतिपादन केले. आपल्याला योग्य माहिती दिली गेलेली नाही, असे निवेदन श्री. बाराथे यांनी केले. श्री. बाराथे यांना पूर्वीही ही माहिती कळविण्यात आली असून मोकळ्या जागेच्या मालकी हक्काबाबत त्यांच्याकडे पुरावा असल्यास त्यांनी तो सादर करावा, असे त्यांना दि. २९.१०.२००७ रोजी कळविण्यात आले होते, असे श्री. रामदास तांबे यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

जागेच्या मालकीसंबंधातील वाद यातील मुख्य विषय असून त्याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत करता येणार नाही. अपीलकर्त्याने त्यासाठी योग्य त्या न्यायासनाकडे दाद मागणे उचित होईल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत महादेव लोहोकरे
६, अजंठा सहकारी गृहरचना संस्था,
आनंदनगर, संतोष बेकरी लेन, सिंहगड रोड, पुणे-४११०५७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६७ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी सौ.हर्षदा वि.शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. -- |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>मौजे खराडी, ता.हवेली येथील स.नं.१४चा भाग नकाशा व साईट प्लानची प्रत. |

## विवेचन

आपण मागितलेला झेन दाखला व साईट प्लानची प्रत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.वसंत महादेव लोहोकरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण १३० रुपये शुल्काची मनीऑर्डर केली होती, परंतु अर्ज स्वीकारला व मनीऑर्डर स्वीकारली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, असे श्री.लोहोकरे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. श्री.लोहोकरे यांचा अर्ज व अपील आढळ होत नाही, त्यामुळे कार्यवाही करता आली नाही, असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी सहाय्यक अभियंता, विकास योजना सौ.हर्षदा वि. शिंदे यांनी नमूद केले. श्री.लोहोकरे यांनी मागितलेली माहिती निःशुल्क देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार त्याच दिवशी (दि.१२.८.२००८ रोजी) श्री.लोहोकरे यांना झोन दाखला व साईट प्लानची प्रत देण्यात आल्याचे नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका यांनी दि.१.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.लक्ष्मण आनंदा सावंत
परशुराम महादेव शिंदे कन्या विद्यालय, दहिवडी, ता.माण, जि.सातारा अपीलकर्ता
(अ.क्र.१४+३५+३५अ+३५ब+३६+३६अ+३६ब+९२+११९+
१२०+१२१+१२२+१२४+१२५+११९+१७८+२४१+२४२+२४३)
(२)श्रीमती हिराबाई आनंदा सावंत (अ.क्र.१७९)
मु.पा.दुधोंडी, ता.पलूस, जि.सांगली

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, गुंजवणी शिक्षण संस्था,
हातवे बु., ता.भोर, जि.पुणे उत्तरवादी
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
सातारा जिल्हा परिषद, सातारा
(३) **अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सातारा
(४)**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा
(५) **अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा
(६) **अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे
(१)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, न्यू इंग्लिश स्कूल, हातवे बु., ता.भोर, जि.पुणे
(२)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, प्रगती गर्ल्स हायस्कूल, सातारा
(३)**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, फलटण, जि.सातारा
(४)**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, कोल्हापूर विभाग
(५)**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती खंडाळा, जि.सातारा
(६)**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा
(७)**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा
(८)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, न्यू इंग्लिश स्कूल, हातवे, ता.भोर, जि.पुणे
(९)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, शिंदेवाडी माध्यमिक विद्यालय, शिंदेवाडी,
ता.खंडाळा, जि.सातारा
(१०)**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ तुरुगाधिकारी, येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४+३५+३५अ+३५ब+३६+३६अ+३६ब+९२+११९+१२०+१२१+१२२+१२५+१२४+१७८+१७९+२४१+२४२+२४३/ सातारा / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. . .२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लक्ष्मण आनंदा सावंत
परशुराम महादेव शिंदे कन्या विद्यालय, दहिवडी, ता.माण, जि.सातारा

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, गुंजवणी शिक्षण संस्था,
हातवे बु., ता.भोर, जि.पुणे
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
सातारा जिल्हा परिषद, सातारा श्री.उदयसिंह भोसले
(१) **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, प्रगती गर्ल्स हायस्कूल, सातारा
श्रीमती के.के.पाटील

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १४ | दि. १७.१.२००६ | दि.११.२.२००६ | दि.१६.३.२००६ | दि.२६.७.२००६ |
| ३५ | दि.-- | दि. -- | दि. -- | दि. -- |
| ३६ | दि. -- | दि. -- | दि. -- | दि. -- |
| ९२ | दि.१७.१.२००६ | दि.२८.२.२००६ | दि.२४.४.२००६ | दि.१२.५.२००६ |
| ११९ | दि. ४.९.२००६ | दि. १३.९.२००६ | दि. -- | दि. १३.९.२००८ |
| १२० | दि. २९.८.२००६ | दि. २०.९.२००६ | दि. -- | दि. २०.९.२००६ |
| १२१ | दि. २९.८.२००६ | दि. २५.९.२००६ | दि.-- | दि. ४.१०.२००६ |
| १२२ | दि. २९.८.२००६ | दि. २९.९.२००६ | दि. -- | दि. २९.८.२००६,<br>दि.९.१०.२००६,<br>दि.२८.९.२००६ |
| १२४ | दि. २९.८.२००६ | दि. २५.९.२००६ | दि. -- | दि. २५.९.२००६<br>दि.३०.९.२००६ |
| १२५ | दि. २९.८.२००६ | दि. १४.९.२००६ | दि.- | दि.१४.९.२००६ |
| १७८ | दि. ४.९.२००६ | दि. १३.९.२००६ | दि. -- | दि. -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | दि. २९.८.२००६ | दि. २०.९.२००६ | दि. -- | दि. २९.९.२००६ |
| २४१ | दि. -- | दि. -- | दि. -- | दि. -- |
| २४२ | दि. -- | दि. -- | दि. -- | दि. -- |
| २४३ | दि. २९.८.२००६ | दि. ५.९.२००६ | दि. -- | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

अपील क्र.३५

श्रीमती सुनिता महादेव दडम व मारुती जितेंद्र दळवी यांच्या तक्रारअर्ज व त्यावरील कार्यवाहीची माहिती.

अपील क्र.१२०+१२१+१२२+१२५+१७९

श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रगती गर्ल्स हायस्कूल शिरवळ या संस्थेचे अध्यक्ष, सचिव व मुख्याध्यापक यांच्याविरुध्दच्या तक्रारीअर्जांची माहिती. तसेच विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या पत्रावरील कार्यवाहीची माहिती.

अपील क्र.१४+९२+१२४+१७९

नेमणूकपत्र, सेवापुस्तके, सेवानिश्चिती, शालेय तपासणी अहवाल, अभ्यासक्रम,एसएससी बोर्ड ऐच्छिक विषय अहवाल व सुपरव्हिजन माहिती, शासकीय कोर्ससाठी गेलेली माहिती, शिक्षक हजेरीपत्रक, गोपनीय अहवाल, परीक्षा विभागप्रमुख माहिती, सेवाज्येष्ठता यादी, पासबुक, चेकबुक, डीसीसी बँक, ५०,०००, शाळा मान्यता व स्वखर्चासाठी घेतलेल्या रकमेंची अडीचपट, ५०००० चे, सौ.सावंत व मुलगी यांना हाकलून देण्यासंदर्भातील खुलासा, बँकेच्या शिरवळ शाखेचे दोन चेक.

अपील क्र.११९+१७८

तहसीलदार, खंडाळा याच्याकडे कु.तन्वी लक्ष्मण सावंत व सौ.सुवर्णा लक्ष्मण सावंत, मु.पो.शिरवळ, ता.खंडाळा यांना दिलेल्या तक्रार अर्जांवरील कार्यवाहीचा तपशील.

अपील क्र.२४३

श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, प्रताप देशमुख, रा.शिरवळ यांचे कारावासातील कालावधीबाबतचा तपशील.

इतर अपिलांमध्ये मूळ अर्ज अपीलकर्त्याने दाखल केलेला नाही. मात्र आनुषंगिक कागदपत्रे व अपिले यातून माहितीची मागणी वरीलप्रमाणेच असल्याचे दिसते.

# विवेचन

श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या प्रगती गर्ल्स हायस्कूल व अन्य शाखांमधील नेमणूकपत्रे, सेवापुस्तके, आपला वर्गशिक्षक म्हणून केलेल्या कामाचा अहवाल आदीबाबतची माहिती अपीलकर्त्या श्रीमती सुवर्णा लक्ष्मण सावंत या गेल्या काही वर्षांपासून सातत्याने मागत आल्या आहेत. त्यांचे पती श्री.लक्ष्मण आनंदा सावंत, सासूबाई श्रीमती हिराबाई सावंत, कन्या कु.तन्वी आदी त्यांच्या निकटवर्ती यांनीही याबाबतची माहिती मागणारे अर्ज विविध अधिकाऱ्याकडे केले आहेत. श्रीमती सुवर्णा लक्ष्मण सावंत या संस्थेत पूर्णवेळ कामाला होत्या. तरीही त्यांना योग्य ते कायदेशीर लाभ देण्यात आले नसून त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. दिलेली माहिती बनावट कागदपत्रांच्या आधारे दिली आहे, असा या सर्व अर्जांतील व अपिलांतील त्यांच्या निवेदनाचा आशय आहे. संस्थेचे अध्यक्ष अथवा मुख्याध्यापिका यांच्याविरुध्द श्रीमती सावंत यांनी वेगवेगळ्या ठिकाणी तक्रारी केलेल्या असून त्या अनुषंगानेही त्या त्या कार्यालयांकडे माहिती मागितली आहे.

संस्था व श्रीमती सावंत यांच्यामध्ये वाद असून उभय बाजू परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करीत आले आहेत. आपण दिलेली माहिती पूर्णपणे खरी असल्याचे संस्थाचालक व मुख्याध्यापिका यांचे म्हणणे आहे, तर पूर्ण खोटी माहिती दिली असल्याचे श्रीमती सावंत व त्यांचे निकटवर्ती यांचे प्रतिपादन आहे. यातील काही अपिलांचा आयोगाच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये समावेश करण्यात आला होता. त्यात उभय घटकांमध्ये माहितीबाबत एकमत झाले नाही, म्हणून सुनावणी घेण्यात आली. उभय बाजूंच्या लेखी व तोंडी निवेदने व सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करता 'संस्थेच्या संबंधित सर्व कागदपत्रांची शहानिशा करुन माहितीच्या खरे-खोटेपणाबद्दल शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी छाननी व अनुषंगिक चौकशी करुन आयोगाला दि.२०.२.२००८ पर्यंत अहवाल सादर करावा,' असा आदेश आयोगाने दि.१३.९.२००७ रोजी (अपील क्र.११०/१११/सातारा) मध्ये दिला होता. दरम्यानच्या काळात, शाळा न्यायाधिकरण, [illegible] शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

अहवाल सादर केला. संस्थेच्या सर्व संबंधित कागदपत्रांची छाननी करुन श्रीमती सावंत यांच्या सर्व नियुक्त्यांचा तपशील श्री.भोसले यांनी अहवालात नमूद केला आहे. 'वरील सर्व नियुक्त्यांच्या कागदपत्रांची तपासणी केली असता त्या तात्पुरत्या स्वरुपाच्या देण्यात आलेल्या आहेत. सदर नियुक्त्यांना या कार्यालयाची मान्यता घेण्यात आलेली नाही, त्यामुळे त्यांची नियुक्तीबाबतची तक्रार ग्राह्य धरता येत नाही. तसेच त्यांची नियुक्ती तात्पुरती असल्याने त्यांचे सेवापुस्तक भरलेले नाही. तसेच सेवकसंच निश्चिती, विद्यालयाचा वार्षिक तपासणी अहवाल, शिक्षक हजेरीपत्रक इत्यादीची तपासणी केली असता श्रीमती सावंत यांचे कोठेही नाव आढळून आलेले नाही. एस.एस.सी.बोर्ड सुपरव्हिजन माहिती, शिक्षक हजेरीपत्रके, परीक्षा माहिती (पर्यवेक्षण तक्ते व वेळापत्रके), सेवाज्येष्ठता यादी पाहण्यात आली. गोपनीय अहवाल उपलब्ध नाहीत. श्रीमती सावंत कोणत्याही वर्गाच्या वर्गशिक्षिका असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे वर्गशिक्षक अहवाल व गृहपाठ वह्या उपलब्ध नाहीत. वरील सर्व वस्तुस्थिती पाहता जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्रगती गर्ल्स हायस्कूल, शिरवळ, ता.खंडाळा यांनी सादर केोल्या कागदपत्रांची शहानिशा केली असता माहिती खरी असल्याचे दिसून येते,' असे श्री.भोसले यांनी दि.१५.२.२००८ च्या अहवालात नमूद केले आहे.

श्रीमती सावंत यांच्या शाळा न्यायाधिकरणातील अपिलाच्या निकालानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे संस्थेचे अध्यक्ष, श्री.प्रताप चं. देशमुख, प्रगती गर्ल्स हायसकूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती के.के.पाटील व संबंधित शिक्षणाधिकारी यांनी आयोगाच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रामध्ये, तसेच स्वतंत्ररीत्याही लेखी नमूद केले. (अ.क्र.२४३) येरवडा मध्यवर्ती कारागृह अधीक्षक, तहसीलदार, खंडाळा यांना पाठविलेल्या अर्जावरील माहिती, (अ.क्र.१७८) संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली असल्याचे अथवा अर्जाची दखल घेऊन योग्य ते उत्तर दिले असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. अपील क्र.१२४ मध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली असल्याचे प्रपत्रात नमूद केले.

'या प्रकरणाची सीआयडी मार्फत शिरवळ, पिसाळवाडी, धनगरवाडी, शिंदेवाडी व शिरवळमधील मंडाई कॉलनी, सखाई कॉलनी या ठिकाणी १९९९ ते नोव्हेंबर २००५ अखेर असलेल्या विद्यार्थिनी व पालक यांच्याकडे गुप्तपणे चौकशी होण्याची व्यवस्था व्हावी,' अशी मागणी श्रीमती सावंत यांनी विविध निवेदनांद्वारे आयोगाकडे केली आहे. तसेच पालकांची पत्रे, विद्यार्थ्यांच्या सह्या असलेली पत्रे, व प्रगती पुस्तकांच्या व गृहपाठांच्या वह्यांच्या प्रती आदी ४३४ पाने पुरावा म्हणून दि.२०.५.२००८ रोजी आयोगाकडे सादर केली.

श्रीमती सावंत यांनी श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ, मुख्याध्यापिका, प्रगती गर्ल्स हायस्कूल, शिरवळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक); जिल्हा परिषद, सातारा व शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर उपविभाग, कोल्हापूर यांच्याविरुध्द शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर याच्याकडे केलेल्या अपिलाचा निकाल न्यायाधिकरणाने दि.२४.६.२००८ रोजी दिला. श्रीमती सावंत यांची नेमणूक कायद्यानुसार योग्य प्रक्रिया पार पाडून झालेली नाही, त्यांना मागील दाराने व बेकायदेशीररीत्या तात्पुरत्या स्वरुपात नेमणुका देण्यात आल्या, त्यामुळे त्यांच्या मागणीस सेवामुक्तीनंतरच्या काळातील पूर्ण वेतनासह त्यांना नोकरीत कायम करण्यास त्या पात्र ठरत नाहीत, असा निष्कर्ष नमूद करुन न्यायाधिकरणाने श्रीमती सावंत यांचे अपील फेटाळले.

श्रीमती सावंत यांच्या श्रीराम शिक्षण संस्था या संस्थेतील सेवेविषयीच्या संदर्भात स्थानिक अधिकाऱ्यांपासून मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता आदीपर्यंत विविध पातळ्यांवर व शिक्षण, महसूल, पोलीस आदी विविध खात्यांकडे श्रीमती सावंत व त्यांचे निकटवर्ती सातत्याने अर्ज, तक्रार, पत्रव्यवहार करीत आले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्जांचा विचार करता संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना वेळोवेळी माहिती दिली आहे. अपील क्र.२४१ व २४२ मध्ये श्रीमती सावंत यांनी प्रथम अपील केलेले नाही. मूळ अभिलेखच बदलले असून बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली आहेत व त्यांची पोलीस गुप्तचर खात्यामार्फत चौकशी व्हावी अशी त्यांची मागणी आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. दिलेली माहिती योग्य असल्याचा निष्कर्ष शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सातारा श्री.उदयसिंह

भोसले यांनी अहवालात नोंदविला आहे. तसेच शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी श्रीमती सावंत यांच्या सेवाविषयक तक्रारीबाबत उभय बाजूंनी दाखल केलेल्या पुराव्याचा सविस्तर ऊहापोह करुन श्रीमती सावंत यांचे अपील फेटाळले आहे. या बाबी लक्षात घेता श्रीमती सावंत व त्यांचे निकटवर्ती यांनी माहितीच्या अधिकारात सातत्याने तीच तीच माहिती पुन:पुन्हा मागणी करुन त्याच त्याच आरोपांची पुनरावृत्ती करुन प्रशासकीय कार्यवाहीची मागणी करणे हा महितीच्या अधिकाराचा योग्य वापर नाही, याची समज श्रीमती सावंत यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील सर्व अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संदीप लक्ष्मण चव्हाण
कांतिनी अपार्टमेंट, बी-४२, खडीमशीनजवळ,
कोंढवा-कात्रज रोड, कोंढवा बु., पुणे-४११०४८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र.विकास अभियंता(पाणीपुरवठा)(प्रकल्प),
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अति.नगर अभियंता (पाणीपुरवठा),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०९ /पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र.विकास अभियंता(पाणीपुरवठा)(प्रकल्प),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.पी.एम.निरभवणे

**जन माहिती अधिकारी** तथा अति.नगर अभियंता (पाणीपुरवठा),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सतीश लक्ष्मण घुमे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.९.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कोंढवा-कात्रज रोडवरील गोकुळनगर येथे बांधलेल्या पाण्याच्या टाकीतून अद्यापपर्यंत खडीमशीन भागाला पाणीपुरवठा का सुरु झालेला नाही, खडीमशीन भागाला कधीपर्यंत पाणीपुरवठा होईल, त्यासाठी या भागातील नगरसेवक काय प्रयत्न करीत आहेत. |
|---|---|

## विवेचन

पुण्यातील कोंढवा-कात्रज रोडवरील गोकुळनगर येथील खडीमशीन भागाला पाणीपुरवठा का होत नाही व तो कधीपर्यंत सुरु होईल, अशी विचारणा अपीलकर्ता श्री.संदीप लक्ष्मण चव्हाण यांनी जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नगर अभियंता(पाणीपुरवठा), पुणे महानगरपालिका यांच्याकडे केली होती. पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु असून पाणीपुरवठा सुरु होण्यास एक महिन्याचा कालावधी लागेल, असे जन माहिती अधिकारी श्री.सतीश घुमे यांनी श्री.चव्हाण यांना कळविले. परंतु तरीही पाणीपुरवठा सुरु झाला नाही, म्हणून श्री.चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी विकास अभियंता(पाणीपुरवठा)(प्रकल्प), पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. लष्कर पाणीपुरवठा विभागाच्या कक्षेतील काम असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधावा, अशी सूचना देऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी लष्कर पाणीपुरवठा विभागास पुढील कार्यवाहीबाबत कळविण्यात येत असल्याचे नमूद केले. लष्कर विभागाशी संपर्क साधला असता २ ते १५ दिवसात पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे आपणांस सांगण्यात आले. त्यांनी खोदकाम सुरु केले, त्यानंतर बुजविले, आपल्याला काही कळविले नाही. नंतर तीन-चार दिवस पाणीपुरवठा सुरु झाला, ते पाणीपुरवठ्याच्या वेळेसह आपल्याला कळविण्यात आले, परंतु त्या वेळेत पाणीपुरवठा होत नसल्याचे आपल्याला समक्ष पाहणीत आढळून आले,असे नमूद करुन, 'याबाबत सखोल चौकशी होऊन पाणीपुरवठा सुरु करण्यात यावा,' या मागणीसाठी श्री.चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संबंधित विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही, मात्र पाणीपुरवठासारख्या महत्त्वाच्या विषयाबाबत असलेल्या सद्यस्थितीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) खडीमशीन भागाच्या पाणीपुरवठ्याची सद्यस्थितीची माहिती अपीलकर्त्यास देण्याचया आयोगाच्या मौखिक आदेशाच्या अनुषंगाने पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त नगर अभियंता(पाणीपुरवठा), पुणे महानगरपालिका यांनी आयोगाला त्वरित सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत कोंडिबा पाटील
मौजे सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा सहनिबंधक,
सहकारी संस्था, जि.कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक उपनिबंधक,
सहकारी संस्था, कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१ / कोल्हापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा सहनिबंधक,
सहकारी संस्था, कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | श्री मल्लीकार्जुन वि.का.स.(विकास)सेवासंस्था मर्यादित, मौजे सांगाव या संस्थेचा दि.१.४.२००४ ते ३१.३.२००५ या कालावधीचा ऑडिट मेमो (श्री.शा.द.भोसले यांनी केलेल्या ऑडिटचा) व श्री.घोरपडेसाहेब यांनी सदर संस्थेची चौकशी केलेली आहे, त्याचा अहवाल व चौकशीनंतर पुढील कारवाई केली त्याचा तपशील. |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.चंद्रकांत कोंडिबा पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.पाटील यांनी मागितलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याने ती देण्याबाबतच्या सूचना संस्थेला देण्यात आल्या व श्री.पाटील यांनी संस्थेशी संपर्क साधून माहिती घ्यावी, असे त्यांना कळविले. त्यानंतर योग्य ते शुल्क भरुन घेऊन माहिती देत असल्याचे संस्थेने त्यांना कळविले. त्यानंतरच्या कार्यवाहीबाबत श्री.पाटील यांनी आपल्याशी संपर्क साधला नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उपनिबंधक, सहकारी संस्था, कागल यांनी आयोगाला दि.२३.१०.२००७ रोजी कळविले. तसेच चौकशी अहवालाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दि.२५.४.२००८ च्या पत्रान्वये कळविली. दि.२३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तही त्यांनी तसे नमूद केले. अपीलकर्ता त्यावेळी गैरहजर होते. 'संस्थेने माहिती देण्याबाबत मला पत्र दिले होते, परंतु त्यामध्ये माहितीच्या कागदपत्रांच्या दराचा उल्लेख नव्हता. तोंडी विचारल्यानंतर अवांतर दर सांगण्यात आला, म्हणून मी त्याचा नाद सोडला आहे,' असे नमूद करुन अपीलकर्त्याने अपील निकाली काढण्याबाबत आयोगाला अवगत

केले आहे. माहिती देण्यासाठी तयार असूनही अपीलकर्त्याने नेलेली नाही, असे अपिलीय प्राधिकारी श्री.धनंजय डोईफोडे यांनी सुनावणीत नमूद केले.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१०.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शाम साधू ससाणे
वाल्मिकी वस्ती, रामटेकडी, पुणे-४११ ०१३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (जनरल)
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी
२. **अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे
३. **अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
पुणे महानगरपालिका, पुणे

१. **जन माहिती अधिकारी** तथा विशेष कार्याधिकारी,
पुणे महानगरपालिका, पुणे

२. **जन माहिती अधिकारी** तथा उप आरोग्य प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे

३. **जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य लेखापाल,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | १४८१+१५२८+२०३९+२०४१+२०४२+ तक्रार-२३९ / पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २६.८.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. शाम साधू ससाणे
वाल्मिकी वस्ती, रामटेकडी, पुणे-४११ ०१३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अशोक कळमकर

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे
डॉ. प्र.शा. धायगुडे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य लेखापाल, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. विरेंद्र जाधवराव

**जन माहिती अधिकारी** तथा उप आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे
डॉ. धनंजय चांदककर

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य लेखापाल, पुणे महानगरपालिका, पुणे
श्रीमती उल्का कळसकर

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र. १४८१/ पुणे**

दि. ८.८.२००४ रोजी महापालिका आयुक्त यांनी स.न. २००४ चे रिट पिटीशन क्र. ४४१७ साठीचे प्रतिज्ञापत्र (Affidavit in reply ) केले त्यामध्ये अशी माहिती दिली आहे की, The Officers of the various department are responsible for spending the funds earmarked for Backward Class Welfare Schemes. सदर माहिती बरोबर आहे की चुकीची आहे याबद्दल सविस्तर माहिती, बरोबर असेल तर महापालिका आयुक्तांनी कोणकोणत्या जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती मागासवर्गीय कल्याण निधी खर्च करण्याकरिता केली आहे याची माहिती, अधिकाऱ्यांची नावे, तसेच सन २००१ ते २००४ पर्यंत निधी किती उपलब्ध करून दिला व कोणकोणत्या खात्यास उपलब्ध करून दिला व त्या प्रत्येक खात्याकडून कशाप्रकारे खर्च झाला व कोणत्या योजनांवर खर्च झाला याची माहिती

**अपील क्र. १५२८/ पुणे**

सन १९९१ ते २००७ या मुदतीमध्ये दवाखाने व रुग्णालये यासाठी आरोग्य प्रमुख प्रमोद धायगुडे व त्यांच्या अधिकारातील खात्यांसाठी किती मागासवर्गीय कल्याणनिधीची तरतूद झाली व सदर निधी कोणकोणत्या योजनांवर खर्च करण्यात आला याची वर्ष निहाय माहिती

**अपील क्र. २०३९ / पुणे**

दि. ४.३.२००६ रोजी मुख्यलेखापाल यांनी सन १९९१ ते २००५ पर्यंतची वर्षनिहाय माहिती दिली आहे. त्याअनुषंगाने सन २००५ ते २००६ व २००६ ते २००७ या वर्षांची मागासवर्गीय कल्याणनिधीची माहिती

**अपील क्र. २०४१ + २०४२/ पुणे**

मागासवर्गीय कल्याणनिधी वेगवेगळ्या खात्यांना कशा प्रकारे उपलब्ध करून दिला जातो याबद्दल पुणे महानगरपालिकेची काय कार्यप्रणाली आहे, तसेच वेगवेगळ्या खात्यांना मागासवर्गीय कल्याण निधी उपलब्ध करून देणेबद्दल कोणाकोणाच्या मान्यता घेतल्या आहेत, याबाबत मान्यतेच्या प्रतींसह माहिती, तसेच मागासवर्गीय कल्याण निधी वेगवेगळ्या खात्यांना उपलब्ध करून दिल्याबद्दल पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाच्या कोणत्या पानावर नोंद याची वर्षनिहाय माहिती, मागील वर्षातील शिल्लक निधी दरवर्षी खर्चास उपलब्ध करून दिला आहे का याची माहिती, जर उपलब्ध करून दिला असल्यास पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाच्या कोणत्या पानावर नोंद आहे याची वर्षनिहाय माहिती, तसेच इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

पुणे महानगरपालिकेतर्फे मागासवर्गीय कल्याण निधीबाबत केलेल्या तरतुदी व खर्च या विषयी अपीलकर्ता श्री. शाम साधू ससाणे यांनी महानगरपालिकेच्या विविध खात्यांच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे माहिती मागितली होती. तत्कालीन महानगरपालिका आयुक्त डॉ. नितीन करीर यांनी मुंबई उच्च न्यायालयातील रिट अर्ज क्र. ४४१७ साठी दि. ८.८.२००४ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल केले. 'मागासवर्गीय कल्याण योजनेसाठी तरतूद केलेल्या निधीचा खर्च करण्याची जबाबदारी विविध खात्यांच्या अधिकाऱ्यांची आहे,' असे या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. त्यानुसार आयुक्त कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडून श्री. ससाणे यांनी माहिती मागितली. विविध खात्यांकडे हा अर्ज पाठवून माहिती संकलित करून आपल्याला देणे आवश्यक होते, असे असताना फक्त नागरवस्ती विकास योजनेकडून माहिती घेऊन समाजकल्याण विभागामार्फत ती देण्यात आली. आरोग्य खात्याकडे मागितलेली माहिती आरोग्य खात्याने आपल्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. मुख्य लेखापाल कार्यालयाने दिलेली माहिती व नागरवस्ती विकास योजना विभागाने दिलेली माहिती यात तफावत आहे. तसेच दारिद्र्य रेषेखालील यादीतील आपले नाव रद्द केले गेले व 'नियमांची पूर्तता न केल्याच्या' कारणावरून आपला अर्ज निकाली काढला. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आपल्या अपिलाची योग्य ती दखल घेतली नाही. 'माहिती मागासवर्गीय योजनेच्या कल्याणाकरिता असल्यामुळे या खर्चाबाबतची माहिती एकत्रित संकलित करून नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याचा'

आदेश उप लोकायुक्त श्री. सुरेश कुमार यांनी दि. ८.५.२००६ रोजी दिला होता, त्याचीही पूर्तता झालेली नाही, अशा विविध कारणांवरून अपीलकर्ता श्री. शाम साधू ससाणे यांनी एका तक्रार अर्जासह वेगवेगळी पाच अपिले राज्य माहिती आयोगाकडे दाखल केली आहेत.

मागासवर्गीय कल्याण निधीच्या विनियोगाबाबतची संपूर्ण माहिती इंटरनेटद्वारा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये महानगरपालिकेने प्रसिध्द करावी, असा आदेश देण्याची विनंती करणारा अर्जही श्री. ससाणे यांनी आयोगाकडे केला आहे.

श्री. ससाणे सन २००४ पासून मागासवर्गीय कल्याण निधीबाबतच्या माहितीची विचारणा करीत आहेत. या संदर्भात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने श्री. ससाणे यांना दंड करून फेटाळली. श्री. ससाणे स्वत: हेल्पलाईन सेवा रोजगार स्वयंसेवी सहकारी संस्था स्थापन करून विविध शिक्षणवर्ग पुणे महानगरपालिकेच्या समाजकल्याण खात्याच्या वतीने चालवीत होते. याबाबतची संस्थेची काही रक्कम महानगरपालिकेने अडवून ठेवल्याच्या संदर्भात यापूर्वी श्री. ससाणे यांनी अर्ज व अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली होती. या पार्श्वभूमीवर श्री. ससाणे विविध अर्जाद्वारे मागासवर्गीय कल्याणनिधीच्या विनियोगाची माहिती मागणारे अर्ज करीत आले आहेत. अर्जाचे विविध खात्यांकडे हस्तांतरण करणे, त्या त्या खात्याने त्याची दखल घेऊन उत्तरे देणे याबाबत महानगरपालिकेच्या यंत्रणेत समन्वय व सुसूत्रता नाही, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून व उभय बाजूंच्या लेखी निवेदनावरून दिसून येते. हे लक्षात घेता श्री. ससाणे यांनी नेमक्या माहितीबाबतचे सर्व अपिलांविषयीचे एकच स्वतंत्र पत्र मुख्य लेखापाल कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे द्यावे व हे पत्र दिल्यापासून एक आठवड्यात जन माहिती अधिकाऱ्यांनी संकलित स्वरूपाची संपूर्ण माहिती त्यांना द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. अपीलकर्त्याने असा अर्ज व त्यावरील कार्यवाही याबाबत अद्यापपर्यंत आयोगाला कोणतेही निवेदन सादर केलेले नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, च्या कलम ४ अन्वये मागासवर्गीय कल्याण निधीबाबतची माहिती इंटरनेटद्वारे जाहीर करण्यासंबंधीच्या श्री. ससाणे यांच्या दि. ३०.१०.२००७ च्या तक्रार-अर्जातील मागणीवरील कार्यवाहीबाबत आयोगाने दि. ४.१२.२००७ रोजी महानगरपालिकेला कळविले होते. त्यानुसार 'संबंधित माहिती दि. ४.७.२००८ अन्वये सांख्यिकी व संगणक प्रमुख, पुणे महानगरपालिका यांच्याकडे

दि. ४.७.२००८ रोजी प्रसिध्दीसाठी पाठविण्यात आली असून पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे,' असे तत्कालीन महानगरपालिका सह आयुक्त, नागरवस्ती विभाग श्री. अशोक कळमकर यांनी आयोगाला दि. २५.८.२००८ च्या पत्रान्वये अवगत केले.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील क्रं. १४८१ + १५२८ + २०३९ + २०४१ +२०४२ + तक्रार-२३९ /पुणे निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.८.२००९**